REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# खेळाच्या विकासात ICT चे महत्त्व

प्रा.डॉ.अनिल गहिनीनाथ कांबळे
सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी.

## प्रस्तावना




मानवी जीवनामध्ये खेळाला अतिशय महत्त्व आहे. शरीर आणि मन आनंदी ठेवण्याचे कार्य खेळ करते. व्यायाम हा ही एक महत्त्वाचा भाग आहे. शारीरिक श्रमाच्या खेळामध्ये खूप व्यायाम होते. भारतामध्ये प्राचीन काळापासून खेळाला महत्त्व देण्यात आले आहे. वैदिक काळात किंवा रामायण, महाराभारताच्या काळामध्ये अनेक प्रकारचे खेळ खेळले जात असे. उदा. द्युत, फासे, कुस्त्या, रथाच्या व घोड्यांच्या शर्यती इ. असे खेळ पाश्चात्य देशातही सोंगट्या, गंजीफा, बुध्दिबळ, शतरंज असे अनेक खेळ खेळले जात होते. या वरुन आपणास असे म्हणता येईल की, खेळाला आपल्या व पाश्चात्य देशातही फार मोठा इतिहास आहे.

खेळ ही मुलाची नैसर्गिक प्रवृत्ती असल्यामुळे मुले सहजपणे खेळ खेळतात त्यामुळे त्याच्या विविध शारीरिक हलचाली झाल्यामुळे त्यांच्यावरील ताणतणाव कमी होतो. असे तणाव रहीत मुले अधिक कार्यक्षम बनतात म्हणूनच मुलांना शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावर खेळाचे फार महत्त्व आहे. कारण अशा खेळामुळे विद्यार्थ्यांच्या अंगी असणारे सुप्त गुण विकसीत होतात त्यामुळे व्यक्तीमत्त्व विकासात शारीरिक क्षमता वाढवतात त्यामुळे खेळाला महत्त्व दिले जाते.

## ● खेळाचे प्रकार

### १. बैठे खेळ

हे खेळ घरामध्ये बसून खेळले जातात. उदा. बुध्दिबळ, गंजीफा, पत्त्याचे खेळ, सोंगट्या, कॅरम, फाशाचे खेळ इत्यादी खेळ हे बैठे खेळ आहेत.

### २. मैदानी खेळ

यामध्ये छोटी मैदाने आणि मोठी मैदाने खेळ असे दोन उपप्रकार पडतात. या मैदानी खेळामध्ये प्रामुख्याने बॅडमिंटन, टेबल टेनिस, रिंग टेनिस, व्हॉलीबॉल, बास्केट बॉल, खो-खो, कब्बड्डी, आट्या-पाट्या, लंगडी, क्रिकेट, फुटबॉल, हॉकी, पोलो, बेसबॉल, गोल्फ, धावण्याच्या शर्यती, गोळाफेक, थाळी फेक, उंचउडी, लांब उडी, अशी विविध प्रकारची खेळ खेळली जातात.

## ● खेळामध्ये ICT चे महत्त्व

### १. IT मध्ये साक्षरता

शारीरिक शिक्षणामध्ये प्रामुख्याने शारीरिक खेळाला फार महत्व असते म्हणून अभ्यासक्रमाचा अधिकांश भाग हा मैदानी खेळावर आधारित आहे आणि इतर भाग पुस्तकी बौध्दिक क्षेत्राशी संबंधित येतो. परंतू या सर्व प्रक्रिये मध्ये आधुनिक काळात उपलब्ध असणारी नव-नवीन तंत्रज्ञान खेळ प्रक्रियेशी संलग्नित करणे आवश्यक ठरले आहे कारण अशा सर्व खेळाची माहिती नवीन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने व्यवस्थित आणि कमी वेळेमध्ये सहजपणे सादर करता येते. इतरांना माहिती देता येते. एकंदरित ICT चा वापर यामध्ये केल्यामुळे अनेक बाबतीत सुलभता निर्माण झ ाली आहे.

### २. संगणकाचा वापर

संगणकामध्ये अनेक अत्याधुनिक सोई उपलब्ध आहेत. संगणक हे खेळाच्या बाबतीत अनेक तंत्रे, कौशल्ये, पध्दती, प्रकार नवनवीन पध्दती विकसित करुन सर्व जगभर पसरविण्याचे मोठे कार्य संगणकाच्या रुपाने होताना दिसून येते.

### ३. सायबर क्राईम

कोणतेही नवीन तंत्रज्ञान विकसित झाले की त्याचे फायद्याबरोबर अनेक तोटेही येतात. अशा तोट्यावर मात करुन अधिकाधिक फायदा कसा होईल या दृष्टिने खेळा संदर्भात विचार करणे महत्त्वाचे आहे.

### ४. गुगलचा वापर

आय.सी.टी.मध्ये गुगल, मोझिला, फायर फॉन्स असे अनेक इंजिन तंत्रज्ञाने विकसित केले आहेत. म्हणजे इंटरनेटवर असे एक संकेतस्थळ

निर्माण केले आहेत. की, ज्यातून आपणास हवी असणारी माहिती कोठे मिळेल याच्या लिंक्स उपलब्ध होतात. या लिंक्स खेळाच्या संदर्भात वापर करुन या बाबत अत्याधुनिक माहिती प्राप्त करता येऊ शकते.

### ५. ई-मेल करणे

इंटरनेटवर याहू, रेडिफ, जीमेल अशी अनेक संकेत स्थळे ईमेल वरुन पुरविली जातात. खेळ किंवा शारीरिक खेळा संदर्भात माहिती एकाठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पोहचविण्यासाठी किंवा तशी माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ICT चे माध्ययम म्हणून ईमेल सारखे साधन फार उपयुक्त ठरते.

### ६. ऑनलाईन शॉपिंग

खेळासंदर्भात लागणारी आवश्यक साधने, वस्तु, साहित्ये हे प्रत्यक्ष बाजारात जावूण शोधून खरेदी करण्यामुळे वेळ, पैसा आणि श्रम खूप मोठ्या प्रमाणात खर्ची पडतो. ते वाचवण्यासाठी ICT चा वापर करुन ॲमेझॉन सारखे ॲप्स मोबाईल किंवा संगणकावर वापरुन घरबसल्या विविध साहित्याची खरेदी करता येते.

### ७. इंटरनेट, फेसबुकवरील साहित्य

फेसबुक हे एक तंत्र लोकांना आकर्षित करणारे साधन आहे. याद्वारे स्वतःचे वैशिष्टये, कामगीरी उपक्रम हे बंदिस्त न ठेवता लोकांना पाहण्यासाठी खुले करण्याचे दालन आहे यातून लोकांना खेळाडूंना प्रेरणा मिळते आणि खेळाच्या विकासात भर घालण्यास मदतीचे ठरते.

### ८. भारतीय भाषासाठी तंत्रज्ञान

माणसां-माणसांमध्ये अनेक पध्दतीने संपर्क साधला जातो. हे संपर्क साधण्यासाठी ICT ने दृकश्राव्य साधनासारखे अनेक माध्यमे उपलब्ध केले आहेत. या माध्यमाच्या सहाय्याने क्रीडा विश्वातील स्थानिक आणि जागतिक पातळीवर घडणाऱ्या घडामोडी या संपर्क माध्यमाने आत्मसात करता येतात. तंत्रज्ञानाने मानवी प्रगती खूप मोठ्या प्रमाणात घडवून आणली आहे. त्याचे सर्व श्रेय या तंत्रज्ञानाला द्यावे लागेल.

### ९. ICT मध्ये साक्षरता

या पोर्टलच्या आयटी साक्षरता विभागाने पुढील बाबी विषयी जागृती निर्माण करण्याकरीता संगणक व हार्डवेअर या विषयी मुलभूत माहिती देण्यात आली आहे. या माहितीचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे वापर हा क्रिडा साहित्यामध्ये करता येईल.

### ● जीवन हे एक क्रीडांगण

मानवाच्या आयुष्यामध्ये खेळाला फार महत्त्व आहे. व्यक्तीच्या शारीरिक आणि इतर गुणांचा विकास हा खेळामुळे होत असतो. खेळाकडे प्रामुख्याने मनोरंजन आणि व्यायाम या दृष्टिने पाहिले जाते. परंतू खेळ हा अनेक अंगाने उपयुक्त ठरतो. मानवाच्या सुप्त गुणांचा विकास तर होतोच परंतू या शिवाय खिलाडू वृत्ती, सांघिक वृत्ती, सहकार्य वृत्ती, नेतृत्त्व गुण, स्पर्धात्मक वृत्ती, एकाग्रता, सहनशीलता, आत्मविश्वास अशा अनेक गुणांचा विकास घडून येतो. त्यासाठी प्रत्येक मानवाने आपले जीवन हे खिलाडू वृत्तीने जगले पाहिजे. जीवनातील सुख, दुःखे, संकटे, आपत्ती अगदी हसतमुखाने तोंड देऊन आपल्या जीवनाचा मार्गक्रमण केला पाहिजे. आधुनिक शिक्षणशास्त्रानेही खेळाचे महत्त्व मान्य केले आहे. कारण खेळ हे शैक्षणिक पध्दतीचे एक महत्त्वाचे अंग बनले आहे. त्यामुळेच शालेय आणि विद्यापीठीय संस्था खेळाच्या विकासासाठी अनेक नवनवीन योजना आखतादा दिसून येतात.

### समारोप

अशा प्रकारे शालेय आणि विद्यापीठीय स्तरावर खेळले जाणारे विविध प्रकारचे खेळ हे मुलांच्या आरोग्याच्या आणि सर्वांगिण विकासासाठी अतिशय महत्त्वाचे आहेत. त्यामुळे हे पारंपारिक पध्दतीने खेळले जाणारे खेळ आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगामध्ये टिकून राहण्याकरीता त्यामध्ये आवश्यक ते बदल घडवून आणणे महत्त्वाचे ठरतात. कारण आधुनिक तंत्रज्ञानाची त्याला जोड दिली तर ते आधुनिक बनतील कारण सध्याचे युग हे माहिती व तंत्रज्ञानाचे युग आहे. या युगातील लोकांचे शारीरिक आणि मानसिक दृष्टया सक्षम नागरिक बनवणे हे आपल्या सर्वांसमोर एक आव्हान बनले आहे. आज बदलत्या जीवनशैलीमुळे मानवाचे कष्ट करण्याची वृत्ती नाही. मोकळी आणि शुध्द हवा मिळत नाही. त्यामुळे लहाणापासून मोठ्या व्यक्तीच्या वयोगटातील सर्वांवर दिवसेंदिवस ताणतणाव वाढत चालला आहे. त्यामुळे अनेक आजारांना बळी पडावे लागत आहे.

**संदर्भग्रंथ :**

1) 'शिक्षणातील विचार प्रवाह', कदम, चा.प., शेटे, सु.त्र्यं. सातारा, समर्थ प्रकाशन,
2) 'शैक्षणिक तंत्रविज्ञान', सुमन ओक, श्रीविद्या प्रकाशन, पुणे 30.
3) 'शैक्षणिक तंत्रज्ञान', ह.ना. जगताप, नूतन प्रकाशन, पुणे.